**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक ०६ जुलै २०२६**

**ठळक बातम्या**

1. **राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज पावसामुळे दिवसभरासाठी स्थगित.**
2. **विदर्भ साहित्य संघातर्फे वाङ्मय पुरस्कारांसाठी प्रवेशिका पाठविण्याचं आवाहन.**
3. **स्मार्ट मीटरबाबतचे गैरसमज दूर करण्यासाठी ८ जुलै रोजी नागपूर आणि वर्धा जिल्ह्यात महावितरणतर्फे ग्राहक मेळाव्यांचं आयोजन.**
4. **भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात आज मुसळधार पर्जन्यवृष्टीचा ऑरेंज अलर्ट.**

---------------------------------------------

विधिमंडळ

मुंबईत पावसाची परिस्थिती पाहता विधानसभेचं कामकाज दिवसभरासाठी स्थगित केल्याची घोषणा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली. तत्पूर्वी मुंबईत गेले ३-४ दिवस कोसळत असलेल्या पावसामुळे जीवितहानी आणि वित्तहानी झाल्याचा मुद्दा विरोधकांनी विधानसभेच्या कामकाजाला सुरुवात होताच उपस्थित केला. मिसिंग लिंकमध्ये दरड कोसळणं, मानखुर्द इथं इमारत कोसळून ६ जणांचा मृत्यू, मॅनहोलमध्ये पडून गेलेले बळी, झाडं पडून झालेले मृत्यू इत्यादी मुद्द्यांवरून त्यांनी सरकारला घेरलं आणि या प्रकरणी जबाबदारी निश्चित करून सरकारनं याविषयी सभागृहात सविस्तर निवेदन करावं, अशी मागणी केली. त्यावर, ही एक अभूतपूर्व नैसर्गिक परिस्थिती असून सर्व प्रशासन अलर्ट मोडवर आहे, यंत्रणा कुठेही कमी पडणार नाही आणि यासंदर्भात उद्या संपूर्ण निवेदन सभागृहात करू, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं. दुपारनंतर ताशी ७० ते ९० किलोमीटर वेगानं वारे वाहण्याची शक्यता लक्षात घेऊन नागरिकांनी सावध रहावं, शक्यतो प्रवास टाळावा आणि विशेषतः युवांनी पर्यटनासाठी बाहेर पडू नये, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं. त्यानंतर पावसाची परिस्थिती पाहता सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी स्थगित करण्यात आलं. विधानपरिषदेतही विरोधकांनी मुंबईतल्या परिस्थितीवरून सरकारला लक्ष्य केलं. गेल्या ३-४ दिवसांत पावसाशी संबंधित

घटनांमध्ये १३ बळी गेल्याचं ते म्हणाले आणि आज हवामान विभागानं दिलेला इशारा पाहता सभागृहाचं कामकाज स्थगित करायची विनंती सभापतींना केली. त्यानंतर सभापती राम शिंदे यांनी कामकाज दिवसभरासाठी तहकूब केलं. दरम्यान, मानखुर्द इथं अर्धवट बांधलेली इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र दुःख व्यक्त केलं असून मृत पावलेल्या ६ जणांच्या कुटुंबांना प्रत्येकी ५ लाख रुपये अर्थसहाय्य जाहीर केलं आहे.

-------------------------------------------

हेल्प लाईन

राज्यात उद्‌भवलेल्या संभाव्य पूरपरिस्थिती आणि मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेला पूर्णपणे सतर्क राहण्याचं आणि प्रशासनाला सहकार्य करण्याचं आवाहन केलं आहे. राज्यात कोणत्याही प्रकारची आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांना तातडीनं मदत मिळावी, यासाठी राज्य सरकारची संपूर्ण यंत्रणा सज्ज असून २४ तास कार्यरत असणारे नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आले आहेत, असं त्यांनी सांगितलं. राज्यस्तरीय मुख्य नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्यासाठी १०७० हा टोल-फ्री क्रमांक कार्यान्वित करण्यात आला असून, नागरिक ०९३२१५८७१४३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर किंवा ०२२-२२०२७९९० आणि ०२२-२२७९४२२९ या दूरध्वनी क्रमांकांवर देखील थेट संपर्क साधू शकतात. याशिवाय, प्रत्येक जिल्हयामध्ये स्थानिक पातळीवर जलद गतीनं मदत कार्य राबवण्यासाठी आणि परिस्थितीवर तात्काळ नियंत्रण मिळवण्यासाठी जिल्हास्तरीय नियंत्रण कक्षही सज्ज ठेवण्यात आले आहेत, ज्यांचा मुख्य संपर्क क्रमांक १०७७ असा आहे. दरम्यान, इंद्रायणी नदीला मोठ्या प्रमाणात पूर आला असून आळंदी शहरात प्रवेश करणारे नदीवरील चारही पूल पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे सध्या आळंदी शहरात येणं सुरक्षित नाही. ज्या वारकरी आणि भाविकांनी आळंदीच्या दिशेनं प्रवास सुरू केला आहे, त्यांनी देहू आणि आळंदी इथं न जाता पुणे शहरात वारीमध्ये सहभागी व्हावं, असं आवाहन फडणवीस यांनी केलं आहे.

-------------------------------------------

अमित शहा

देशात गेल्या ७५ वर्षांत सहकार क्षेत्रात होणारी आंदोलनं ही नेहमी दुर्लक्षित होती. मात्र, सहकार क्षेत्राला एक शतक पुढे नेण्याचं कार्य सहकार मंत्रालयाच्या स्थापनेमुळे शक्य झाल्याचं केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा म्हणाले. सहकार मंत्रालयाच्या पाचव्या स्थापना दिनानिमित्तानं आज त्यांच्या हस्ते देशभरातल्या अनेक

महत्त्वाच्या सहकार उपक्रमांची पायाभरणी आणि उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. देशातल्या सहकार क्षेत्रात झालेल्या कामाविषयी शहा म्हणाले...

***(होल्ड बाईट - केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा)***

या कार्यक्रमात देशभरातल्या २३२ धान्य साठवण गोदामांचं उद्घाटन, सहकार वन तसंच, महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश या राज्यांतील उती संवर्धन सुविधांचं भूमिपूजन शहा यांनी केलं. या कार्यक्रमा दरम्यान ५० हजार प्राथमिक कृषी पतसंस्थांचं इ-पॅक्समध्ये रूपांतर करण्यात आलं. त्याचबरोबर, बियाणे प्रणाली बळकट करण्यासाठी भारतीय बीज सहकारी समिती आणि भारतीय कृषी संशोधन परिषदेदरम्यान सामंजस्य करारही करण्यात आला.

---------------------------------------------

रेल्वे उद्घाटन

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नांदेड मुंबई आणि टनकपूर नांदेड या एक्सप्रेस गाड्यांचं उद्घाटन केलं. ओदिशात भुवनेश्वर इथं झालेल्या कार्यक्रमात त्यांनी दूरस्थ पद्धतीनं या गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला. नांदेड मुंबई ही एक्सप्रेस गाडी वाशिम आणि हिंगोली मार्गे जाणार असून त्यामुळे मराठवाडा आणि विदर्भाकडे जाणाऱ्या आणि येणाऱ्या प्रवाशांची सोय होणार आहे.

---------------------------------------------

विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघानं १ ऑगस्ट २०२५ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत प्रकाशित झालेल्या ग्रंथांसाठी वाङ्मय पुरस्काराकरिता प्रवेशिका मागविल्या आहेत. कादंबरी, कविता, कथा, समीक्षा, नाट्य, आत्मचरित्र, बालसाहित्य, अनुवाद, कृषी साहित्य, दलित साहित्य आदी विविध प्रकारांतील ग्रंथांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. वैदर्भीय पुरस्कारांचं स्वरूप ११ हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह, तर राज्यस्तरीय पुरस्कारांचं स्वरूप २५ हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह असं आहे. लेखक किंवा प्रकाशकांनी ग्रंथांच्या दोन प्रती  परिचय आणि पासपोर्ट फोटोसह ३१ ऑगस्टपर्यंत विदर्भ साहित्य संघ, सीताबर्डी, नागपूर इथं पाठवाव्यात, असं आवाहन करण्यात आलं आहे. या पुरस्कारांचं वितरण विदर्भ साहित्य संघाच्या  वर्धापन दिनानिमित्त १४ जानेवारी २०२७ रोजी करण्यात येणार आहे.

---------------------------------------------

SeFet 2026

विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था (व्हीएनआयटी) नागपूर इथं 'शाश्वत ऊर्जा आणि भविष्यातील इलेक्ट्रिक वाहतूक' (SeFet 2026) या विषयावर ८ ते ११ जुलै दरम्यान चार दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. परिषदेचं उद्घाटन ९ जुलै रोजी सायंकाळी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती संस्थेचे संचालक प्रेमलाल पटेल यांनी दिली. या परिषदेसाठी जगभरातून १ हजार ८०० हून अधिक संशोधनपत्रं प्राप्त झाली असून त्यापैकी ५२० संशोधनपत्रांची सादरीकरणासाठी निवड करण्यात आली आहे. स्मार्ट ग्रीड्स, अक्षय ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहतूक, कृत्रिम बुद्धिमत्ता, ऊर्जा साठवण तंत्रज्ञान आणि पॉवर सिस्टम स्थिरता आदी विषयांवर या परिषदेत सखोल चर्चा होणार आहे.

--------------------------------------------

ग्राहक मेळावे

स्मार्ट मीटरबाबतचे गैरसमज दूर करण्यासाठी आणि ग्राहकांच्या तक्रारींचं तत्काळ निराकरण करण्यासाठी महावितरणतर्फे ८ जुलै रोजी नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील सर्व उपविभागांमध्ये सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत ग्राहक मेळाव्यांचं आयोजन करण्यात आलं आहे. या मेळाव्यात स्मार्ट मीटरच्या कार्यपद्धतीची माहिती देण्यासह वीजबिल आणि मीटर संदर्भातील तक्रारींचं जागेवरच निराकरण करण्यात येणार आहे. सोशल मीडियावरील अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहिती घेण्यासाठी ग्राहकांनी मेळाव्यांना उपस्थित रहावं, असं आवाहन महावितरणनं केलं आहे.

--------------------------------------------

कर्जमाफी

राज्य शासनानं नुकतीच 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेतकरी कर्जमुक्ती योजना-2026' जाहीर केली आहे. यासोबतच डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेचाही लाभ शेतकऱ्यांना देण्यात येत आहे. सन 2025-26 या आर्थिक वर्षात चंद्रपूर जिल्ह्यातील 1 लक्ष 41 हजार 646 शेतकऱ्यांच्या बँक खात्यात 32 कोटी 60 लक्ष 8 हजार रुपये व्याजाची रक्कम थेट जमा करण्यात आली आहे. त्यामुळे ही योजना नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे.

--------------------------------------------

जल जीवन मिशन

अमरावती जिल्ह्यातील टँकरग्रस्त गावांतील पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि जल जीवन मिशनअंतर्गत प्रलंबित

कामांना गती द्यावी, असे निर्देश पाणीपुरवठा आणि स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले. अचलपूर आणि  चांदूरबाजार तालुक्यातील पाणीपुरवठा योजनांचं पुनर्सर्वेक्षण करून १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेशही त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. दुर्गम आणि आदिवासी भागातील पाणीपुरवठा योजनांना प्राधान्य देण्यावरही त्यांनी भर दिला.

---------------------------------------------

पॉश

कामाच्या ठिकाणी महिलांचं लैंगिक छळापासून संरक्षण अधिनियम २०१३ अर्थात पॉश कायद्या अंतर्गत भंडारा जिल्ह्यातील १८९ शासकीय आणि ६५२ खासगी आस्थापनांची तपासणी सुरू करण्यात आली आहे. जिल्हा महिला आणि  बाल विकास कार्यालयामार्फत १५ जूनपासून ही विशेष मोहीम राबविण्यात येत असून, गेल्या शुक्रवारपर्यंत ५० आस्थापनांची प्रत्यक्ष तपासणी पूर्ण करण्यात आली आहे.

---------------------------------------------

हवामान

विदर्भातील भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात आज मुसळधार पर्जन्यवृष्टीचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये देखील जोरदार पर्जन्यवृष्टीची  शक्यता असल्यानं  या ठिकाणी येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.  उद्या अमरावती आणि अकोला जिल्ह्यात मुसळधार पावसाची शक्यता आहे, तर वर्धा, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा इथं देखील जोरदार पाऊस पडू शकतो, असा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवला आहे.

---------------------------------------------

सायकल वारी

क्रीडाभारती सायकलिंग ग्रुपतर्फे सलग चौथ्या वर्षी आयोजित 'पंढरपूर सायकलवारी' उत्साहात पंढरपूरकडे रवाना झाली. यवतमाळमधील  शिवतीर्थ इथून निघालेल्या या सायकलवारीचं  नागरिकांनी विठ्ठलनामाच्या गजरात स्वागत केलं.

---------------------------------------------